# CSK च्या चाहत्यांसाठी गुडन्यूज!

## धोनी एल क्लासिको सामन्यातून करणार पुनरागमन

**महाईन्यूज । चेन्नई**

**थाला महेंद्रसिंग धोनी यंदाच्या आयपीएलमधील अद्याप एकही सामना खेळलेला नाही. धोनीने कारकिर्दीत पहिल्यांदाच आयपीएलचे इतके सामने खेळलेला नाही. सीएसकेने माहिती दिल्यानुसार धोनीच्या पोटरीला दुखापत झाली होती. त्यामुळे दोन आठवडे आयपीएलचे सामने खेळू शकणार नसल्याचं सांगण्यात आलं होतं. धोनी सामने खेळत नसला तरी संघाच्या सरावांना मात्र नेट्समध्ये उपस्थित होता. आता धोनीच्या पुनरागमनाची तारीख अखेर ठरली आहे.**



धोनीच्या अनुपस्थितीत चेन्नई सुपर किंग्सची यंदाच्या आयपीएलची सुरूवात फार खराब झाली. चेन्नईने सुरूवातीचे सलग तीन सामने गमावले होते. आता चेन्नईने सलग २ सामने जिंकल्याने संघाची गाडी पुन्हा रूळावर आली.

चेन्नईने यंदाच्या संघात युवा खेळाडूंवर भर दिला आहे, त्यानुसार सुरूवातीला संघाला परिणाम मिळवता आला नव्हता. आता धोनीच्या येण्याने संघाची घडी नीट बसणार का, यावर सर्वांच्या नजरा असतील.

महेंद्रसिंग धोनी आयपीएल २०२६ मधील पहिला सामना २३ एप्रिल रोजी वानखेडे स्टेडियमवर मुंबई इंडियन्सविरुद्ध खेळण्याची शक्यता आहे. सीएसकेच्या सूत्रांनुसार, ४४ वर्षीय धोनी प्री-सीझन कॅम्पदरम्यान झालेल्या दुखापतीमुळे सध्या विश्रांतीवर आहे, पण आता तो पूर्णपणे फिट होण्याच्या जवळ पोहोचला आहे. सीएसकेचा पुढील सामना सनरायझर्स हैदराबादविरुद्ध आहे, मात्र धोनी संघासोबत प्रवास करणार की नाही, याबाबत अद्याप स्पष्टता नाही.

## RCB चा 'रॉयल' थाट!




लखनौचा धुव्वा उडवत गुणतालिकेत गाठलं अव्वल स्थान

# शेन वॉर्नचा मृत्यू कोरोना लसीमुळेच झाला; मुलाच्या दाव्याने मोठी खळबळ

**महाईन्यूज । ऑस्ट्रेलिया**

**ऑस्ट्रेलियाचा महान फिरकी गोलंदाज शेन वॉर्न याचं २०२२ मध्ये थायलंडमध्ये निधन झालं. क्रिकेट विश्वाला धक्का देणाऱ्या या दुःखद घटनेला चार वर्षे उलटली आहेत. यानंतर आता त्याच्या मुलाने त्यांच्या मृत्यूच्या कारणाबद्दल एक मोठं वक्तव्य केलं असून त्यामुळे मोठा गौप्यस्फोट झाला आहे.**





वयाच्या ५२व्या शेन वॉर्नने जगाचा निरोप घेतला. त्याचा मुलगा जॅक्सनने दावा केला आहे की, त्याच्या वडिलांचा मृत्यू कोविड-१९ लसीमुळे झाला. '2 WORLDS COLLIDE' या पॉडकास्टवर बोलताना, जॅक्सनने आपल्या वडिलांच्या आरोग्याच्या समस्यांचीही कबुली दिली.

जॅक्सन म्हणाला, "मला नक्कीच वाटतं की यात कोविड लसीची भूमिका होती. मला नाही वाटत की आता हे बोलल्याने कोणताही वाद निर्माण होईल. वडिलांना आधीपासूनच काही आरोग्याशी निगडित समस्या होत्या, तरीही मला वाटतं की लसीमुळे त्यांची प्रकृती अधिकच खालावली. मी नेहमी याबद्दल विचार करतो. (वॉर्न यांच्या मृत्यूची बातमी मिळाल्यानंतर) फोन ठेवताच, माझी पहिली प्रतिक्रिया तात्काळ सरकार आणि कोविड लसीला दोष देण्याची होती."

जॅक्सन म्हणाला की,शोकसभेत आपले विचार स्पष्टपणे मांडण्यापासून त्याने स्वतःला मोठ्या मुश्किलीने रोखलं. "शोकसभेत या गोष्टींचा खुलासा न करणं आणि शांत राहणं अधिक शहाणपणाचं ठरलं. जर मी काही बोललो असतो तर माझी परिस्थिती पूर्णपणे वेगळी असती. याआधीही हृदयविकाराच्या झटक्याने बऱ्याच जणांचा मृत्यू झाला होता. पण बाबा ठीक होते. मला वाटतं त्यांनी ३-४ लसी घेतल्या होत्या."

त्यांना (शेन वॉर्न) लस घ्यायची नव्हती, पण इतरांप्रमाणे दैनंदिन काम करण्यासाठी लस घेणं भाग पडलं. मला त्याबद्दल जास्त विचार करायचा नाही, कारण त्यामुळे फक्त राग वाढतो, असं जॅक्सन पुढे म्हणाला.

शेन वॉर्नच्या जीवनशैलीबद्दल बोलताना जॅक्सन म्हणाला की, धूम्रपान आणि मद्यपान करूनही ते निरोगी होते. "बाबा तेव्हा निरोगी आणि आनंदी होते. बऱ्याच काळानंतर ते खूप चांगले दिसत होते. ते नक्कीच धूम्रपान आणि मद्यपान करायचे, पण ऐंशी-नव्वद वर्षांचे अनेक लोक बाबांपेक्षा खूप जास्त धूम्रपान आणि मद्यपान करतात," असे ते म्हणाले. महत्त्वाचं म्हणजे वॉर्नच्या मृत्यूच्या काही महिन्यांपूर्वी त्याला कोविड-१९ ची लागण झाली होती. जेव्हा त्याचं अचानक निधन झालं, तेव्हा तो कोणत्याही गंभीर आजाराने त्रस्त नव्हता.

# पवना नदी प्रदूषणाविरोधात अमरण उपोषणाचा तिसरा दिवस

## माजी नगरसेवक तुकाराम भोंडवे यांचे आंदोलन तीव्र; प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे नागरिक संतप्त

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**पिंपरी-चिंचवड शहरातील पर्यावरणाच्या ज्वलंत प्रश्नावर सुरू असलेल्या अमरण उपोषणाचा आज तिसरा दिवस उजाडला असून, प्रशासनाच्या उदासीनतेमुळे नागरिकांमध्ये तीव्र संतापाची भावना निर्माण झाली आहे.**




पिंपरी चिंचवड महानगरपालिकेकडून सांडपाणी थेट पवना नदीत सोडले जात असल्याच्या निषेधार्थ माजी नगरसेवक तुकाराम महादू भोंडवे यांच्या नेतृत्वाखाली १३ एप्रिल २०२६ रोजी सकाळी १० वाजल्यापासून सिम्बॉयसिस कॉलेजजवळ ओढ्याच्या पुलाजवळ अमरण उपोषण सुरू करण्यात आले आहे. मात्र, तीन दिवस उलटूनही प्रशासनाने या गंभीर प्रश्नाकडे कोणतेही ठोस पाऊल उचललेले दिसत नाही.

दरम्यान, भारतीय जनता पार्टी युवा मोर्चाचे सचिव जालिंदर काटे यांनी उपोषणाला पाठिंबा दिला आहे. संतोष भोंडवे, अंकुश भोंडवे, राजेंद्र भोंडवे आणि दादाजी पगार, नंदकुमार बहिरट, राजू राक्षे उपस्थित होते.

पवना नदी ही शहराची जीवनवाहिनी असताना, त्यात सोडल्या जाणाऱ्या सांडपाण्यामुळे प्रदूषणाची पातळी दिवसेंदिवस वाढत आहे. याचा थेट परिणाम नागरिकांच्या आरोग्यावर होत असून, परिसरातील रहिवाशांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

दरम्यान, उपोषणाचा तिसरा दिवस सुरू असताना उपोषणकर्त्यांची प्रकृती खालावत चालली आहे. तरीही ना प्रशासन, ना लोकप्रतिनिधी यांनी या आंदोलनाकडे गांभीर्याने पाहिलेले दिसत असल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे.

"नदी वाचवा, शहर वाचवा" अशी घोषणा देत नागरिकांनी या आंदोलनाला मोठा पाठिंबा दर्शवला असून, लवकरात लवकर ठोस निर्णय न घेतल्यास आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशारा देण्यात आला आहे. शहराच्या पर्यावरणाचा प्रश्न आता गंभीर वळणावर पोहोचला असून, प्रशासनाच्या भूमिकेकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

### माजी नगरसेवक तुकाराम भोंडवे यांच्या मागण्या...

1. पवना बंद जलवाहिनीचे काम तातडीने सुरू करावे.
2. सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प सुरू करावेत.
3. ओढा- नाल्यातून येणारे सांडपाणी नदी पात्रात सोडण्यास प्रतिबंध करावा.
4. गृहप्रकल्पांतील एसटीपी प्लँट कार्यान्वयीत करावेत. त्यासाठी प्रशासनाने नियमावलीची अंमलबजावणी करावी.

> पवना नदीत सोडले जाणारे सांडपाणी हा केवळ पर्यावरणाचा नाही तर नागरिकांच्या आरोग्याचा गंभीर प्रश्न आहे. माजी नगरसेवक तुकाराम महादू भोंडवे यांनी सुरू केलेल्या या अमरण उपोषणाला आमचा पूर्ण पाठिंबा आहे. प्रशासनाने तात्काळ दखल घेऊन ठोस उपाययोजना केल्या नाहीत, तर भारतीय जनता पार्टी युवा मोर्चा रस्त्यावर उतरून तीव्र आंदोलन छेडेल.
>
> – जालिंदर काटे, सचिव, भारतीय जनता पार्टी युवा मोर्चा.

## चिखलीतील दूषित पाणीप्रश्न गंभीर; नागरिक त्रस्त-प्रशासनावर कारवाईचा दबाव वाढला

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**पिंपरी-चिंचवड शहरातील चिखली परिसरात इंद्रायणी नदीवरील पाणी उपसा केंद्र आणि जलशुद्धीकरण केंद्रातून होणाऱ्या पाणीपुरवठ्याच्या गुणवत्तेबाबत गंभीर प्रश्न निर्माण झाले आहेत. मोशी प्राधिकरणासह सेक्टर ४, ६, ९, ११, संतनगर, मोशीगाव, डुडुळगाव आणि चऱ्होली परिसरात दूषित पाणीपुरवठ्यामुळे नागरिकांमध्ये तीव्र संताप आणि भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.**





स्थानिक नागरिकांच्या तक्रारींनुसार पुरवठा होणाऱ्या पाण्यात गढूळपणा, दुर्गंधी, पिवळसर-हिरवट रंग तसेच काही ठिकाणी अळ्या व जंतू आढळून येत आहेत. यामुळे पोटदुखी, जुलाब, उलट्या आणि मळमळ यांसारख्या आरोग्याच्या तक्रारी वाढल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. विशेषतः लहान मुले आणि ज्येष्ठ नागरिक यांना याचा मोठा फटका बसत आहे.

सामाजिक कार्यकर्ते श्री. रविंद्र आळणे (अथर्व वॉटर टेक सोल्युशन्स) यांनी विविध भागांतून पाण्याचे नमुने गोळा करून मान्यताप्राप्त प्रयोगशाळांमध्ये तपासणी केली असता, त्यात बॅक्टेरिया आणि आरोग्यास घातक घटक आढळल्याचा दावा करण्यात आला आहे. या अहवालांमुळे पाण्याच्या सुरक्षिततेबाबत गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत.

या समस्येवर श्री. रविंद्र आळणे, श्री. दीपक नाईक, श्री. नितीन यादव आणि श्री. किशोर थोरात यांनी सातत्याने प्रशासनाकडे पाठपुरावा केला आहे. विविध सोसायट्यांनी अधिकृत तक्रारी, पत्रव्यवहार आणि ई-मेलद्वारेही समस्या मांडली आहे.

दि. ४ एप्रिल रोजी नागरिकांनी एकत्र येत महापौरांकडे निवेदन देऊन तातडीने उपाययोजना करण्याची मागणी केली होती. मात्र समस्या अद्याप कायम असल्याने नागरिकांमध्ये नाराजी वाढत आहे. ही समस्या नवीन नसून २०२५ मध्येही याच स्वरूपाची परिस्थिती निर्माण झाली होती. पावसाळ्यात परिस्थिती सुधारते, मात्र पावसाळ्यानंतर पुन्हा दूषित पाणीपुरवठ्याची समस्या उद्भवत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.

दरम्यान, परिसरातील नागरिकांची प्रमुख मागणी म्हणजे पूर्वीप्रमाणे पवना नदीतून स्वच्छ पाणीपुरवठा सुरू करावा, तसेच चिखली-निघोजे प्रकल्पाच्या कार्यक्षमतेची सखोल चौकशी करण्यात यावी.

### ..अन्यथा आंदोलन छेडणार!

या प्रकरणात विविध सामाजिक संघटनांनीही सहभाग घेत प्रशासनावर दबाव वाढवला आहे. ६ एप्रिल रोजी नियोजित आयुक्तांसोबतची बैठक रद्द झाल्यानंतर १० एप्रिल रोजी झालेल्या बैठकीत लोकप्रतिनिधींनी ठोस कारवाईची मागणी केली. तसेच ११ एप्रिल रोजी जलशुद्धीकरण केंद्राला प्रत्यक्ष भेट देऊन परिस्थितीचा आढावा घेण्यात आला. नागरिकांनी प्रशासनाला इशारा दिला आहे की, तातडीने शुद्ध व सुरक्षित पाणीपुरवठा सुरू न झाल्यास मोठ्या प्रमाणावर आंदोलन छेडले जाईल. मूलभूत गरज असलेल्या पाण्याच्या गुणवत्तेबाबत प्रशासनाने तातडीने प्रभावी उपाययोजना करावी, अशी जोरदार मागणी होत आहे.

# चिखलीत पोलीस स्टेशनसाठी जागेला स्थायी समितीची मंजुरी

## नगरसेवक कुंदन गायकवाड, नगरसेवक निलेश नेवाळे यांच्या पाठपुराव्याला यश

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**चिखली येथील घरकुल प्रकल्प परिसरात पोलीस स्टेशन उभारण्यासाठी आवश्यक जागा उपलब्ध करून देण्यास स्थायी समिती सभेने मंजुरी दिली असून, नगरसेवक कुंदन गायकवाड आणि नगरसेवक निलेश नेवाळे यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला मोठे यश मिळाले आहे.**



पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमार्फत JNNURM योजनेअंतर्गत चिखली सेक्टर क्रमांक १७ व १९ येथे आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी (EWS) उभारण्यात आलेल्या घरकुल प्रकल्पामध्ये सुमारे ३० हजार नागरिक वास्तव्यास आहेत. वाढत्या लोकसंख्येमुळे परिसरात कायदा व सुव्यवस्थेचे प्रश्न निर्माण होत असल्याने या ठिकाणी स्वतंत्र पोलीस स्टेशनची आवश्यकता व्यक्त केली जात होती.

यासाठी घरकुल प्रकल्पाच्या प्रवेशद्वाराशेजारील मनपा मालकीच्या सुमारे १५ गुंठे मोकळ्या जागेवर चिखली पोलीस स्टेशन उभारण्याचा प्रस्ताव नगरसेवक कुंदन गायकवाड आणि निलेश नेवाळे यांनी सातत्याने मांडला होता. संबंधित विभागाकडूनही या मागणीस सकारात्मक शिफारस करण्यात आली होती.

दरम्यान, या प्रस्तावास स्थायी समिती सभेत मंजुरी मिळाल्याने आता पोलीस स्टेशन उभारणीचा मार्ग अधिक सुकर झाला आहे. या निर्णयामुळे चिखली घरकुल प्रकल्प तसेच परिसरातील नागरिकांच्या सुरक्षेत मोठी भर पडणार आहे. स्थानिक नागरिकांनी या निर्णयाचे स्वागत केले असून, नगरसेवकांच्या पाठपुराव्याचे कौतुक केले आहे.

प्रभाग क्रमांक ११ मधील स्थानिक नगरसेविका रिटा सानप आणि नगरसेविका योगीता नागरगोजे यांनीसुद्धा पोलीस स्टेशनच्या जागेसाठी प्रशासनाकडे पाठपुरावा केला.



चिखली घरकुल परिसरातील वाढती लोकसंख्या आणि त्यानुसार निर्माण होणारे कायदा व सुव्यवस्थेचे प्रश्न लक्षात घेता येथे स्वतंत्र पोलीस स्टेशन होणे अत्यंत गरजेचे होते. यासाठी आम्ही सातत्याने पाठपुरावा केला आणि स्थायी समितीने मंजुरी दिल्याचा आनंद आहे. या निर्णयामुळे नागरिकांची सुरक्षितता अधिक बळकट होईल.

– **कुंदन गायकवाड, नगरसेवक, भाजपा.**

# वाढत्या उष्णतेच्या पार्श्वभूमीवर नागरिकांनी सतर्क राहण्याचे आवाहन

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**शहरात दिवसेंदिवस तापमानात वाढ होत असून उष्माघाताचा धोका निर्माण झाला आहे. या पार्श्वभूमीवर पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वैद्यकीय विभागामार्फत नागरिकांना आवश्यक ती खबरदारी घेण्याचे आवाहन करण्यात येत आहे. उन्हाळ्याच्या दिवसांत योग्य काळजी घेतल्यास उष्माघातासारख्या गंभीर आजारापासून बचाव करता येऊ शकतो.**




उन्हाळ्यातील वाढत्या तापमानाच्या पार्श्वभूमीवर नागरिकांच्या आरोग्याच्या संरक्षणाला सर्वोच्च प्राधान्य देण्यात आले आहे. संभाव्य उष्माघाताच्या घटनांचा विचार करून महापालिकेच्या सर्व रुग्णालयांमध्ये आवश्यक सुविधा आणि वैद्यकीय यंत्रणा सज्ज ठेवण्यात आली आहे. नागरिकांनी योग्य ती खबरदारी घ्यावी आणि कोणताही त्रास जाणवल्यास त्वरित महापालिका रुग्णालयात उपचार घ्यावेत.

– **डॉ. विजय सूर्यवंशी, आयुक्त, पिंपरी चिंचवड महापालिका.**

उष्माघात ही एक गंभीर आरोग्य समस्या असून शरीराचे तापमान अत्यंत वाढल्यास चक्कर येणे, अशक्तपणा, उलट्या, डोकेदुखी, गोंधळ होणे किंवा बेशुद्धावस्था अशी लक्षणे दिसू शकतात. अशा वेळी विलंब न करता त्वरित सावलीत जाऊन प्राथमिक उपचार घ्यावेत व जवळच्या महापालिका रुग्णालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

महानगरपालिकेच्या सर्व रुग्णालयांमध्ये उष्माघाताच्या रुग्णांसाठी आवश्यक वैद्यकीय सुविधा उपलब्ध असून आपत्कालीन परिस्थितीत त्वरित उपचार मिळण्यासाठी आरोग्य यंत्रणा सज्ज ठेवण्यात आली आहे. नागरिकांनी लक्षणांकडे दुर्लक्ष न करता वेळेवर उपचार घेणे अत्यंत आवश्यक आहे.

महानगरपालिका प्रशासनाकडून सर्व नागरिकांना आवाहन करण्यात येत आहे की, वाढत्या तापमानाच्या पार्श्वभूमीवर योग्य ती खबरदारी घेऊन उष्माघातापासून स्वतःचे व आपल्या कुटुंबाचे संरक्षण करावे.

## उष्माघाताची लक्षणे ओळखा

- अंगात प्रचंड उष्णता जाणवणे
- चक्कर येणे किंवा डोके हलके वाटणे
- मळमळ, उलट्या होणे
- तीव्र डोकेदुखी
- त्वचा कोरडी व गरम होणे
- गोंधळ, अस्वस्थता किंवा बेशुद्धावस्था

## उष्माघात टाळण्यासाठी ही काळजी घ्यावी

- दुपारी १२ ते ४ या वेळेत उन्हात जाणे टाळावे.
- भरपूर पाणी आणि द्रवपदार्थ सेवन करावे.
- डोक्यावर टोपी, छत्री किंवा कापड वापरावे.
- सैल व हलक्या रंगाचे सूती कपडे परिधान करावेत.
- उपाशीपोटी बाहेर पडू नये.
- थकवा जाणवल्यास त्वरित सावलीत विश्रांती घ्यावी.
- लहान मुले, ज्येष्ठ नागरिक आणि बाहेर काम करणाऱ्यांनी विशेष काळजी घ्यावी.

उष्माघात ही टाळता येण्याजोगी पण गंभीर समस्या आहे. विशेषतः लहान मुले, ज्येष्ठ नागरिक आणि बाहेर काम करणाऱ्यांनी अधिक काळजी घेणे आवश्यक आहे. शरीरातील पाण्याची कमतरता आणि अतिउष्णतेमुळे चक्कर येणे, मळमळ, डोकेदुखी, अशक्तपणा अशी लक्षणे दिसू शकतात. अशी लक्षणे जाणवताच विलंब न करता सावलीत विश्रांती घ्यावी आणि त्वरित जवळच्या महापालिका रुग्णालयात उष्माघातावर प्रतिबंधात्मक उपचार घ्यावेत.

– **डॉ. लक्ष्मण गोफणे, आरोग्य वैद्यकीय अधिकारी, महापालिका.**

# क्रीडा शिक्षकांना गैर-क्रीडा कामांमुळे खेळाडूंचे नुकसान

## क्रीडा शिक्षकांना अन्य कामे नको : अरुण पाडुळे यांची प्रशासनाकडे मागणी

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**पिंपरी चिंचवड शहराची ओळख “क्रीडा नगरी” म्हणून निर्माण व्हावी, यासाठी क्रीडा शिक्षकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असताना त्यांनाच निवडणूक व इतर प्रशासकीय कामांमध्ये गुंतवले जात असल्याने खेळाडूंना योग्य मार्गदर्शन मिळत नसल्याची खंत व्यक्त होत आहे. या पार्श्वभूमीवर भाजपा क्रीडा प्रकोष्ट शहराध्यक्ष अरुण पाडुळे यांनी क्रीडा शिक्षकांना गैर-क्रीडा कामकाजातून तात्काळ मुक्त करण्याची मागणी केली आहे.**



याबाबत महानगरपालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांना निवेदन देण्यात आले. यावेळी नगसेवक कुंदन गायकवाड, नगरसेविका योगीता नागरगोजे, सामाजिक कार्यकर्ते सचिन सानप उपस्थित होते.

पिंपरी चिंचवड हे औद्योगिक नगरी म्हणून देशभर ओळखले जाते; मात्र या शहराची ओळख क्रीडा क्षेत्रातही निर्माण व्हावी, असे अनेक खेळाडूंचे स्वप्न आहे. मात्र सध्या क्रीडा शिक्षकांना निवडणूक तसेच इतर प्रशासकीय जबाबदाऱ्या देण्यात येत असल्याने ते मैदानावर कमी आणि कागदपत्रांच्या कामात अधिक गुंतले जात आहेत. परिणामी, होतकरू खेळाडूंना योग्य प्रशिक्षण व मार्गदर्शनापासून वंचित राहावे लागत असल्याची चिंता व्यक्त केली जात आहे.

या संदर्भात अरुण पाडुळे यांनी प्रशासनाला आवाहन करत महानगरपालिकेच्या शाळांमधील क्रीडा शिक्षकांना निवडणूक व इतर गैर-क्रीडा कामकाजातून मुक्त करावे, तसेच शहराची वाढती लोकसंख्या लक्षात घेऊन नवीन क्रीडा शिक्षकांची भरती प्रक्रिया तातडीने राबवावी, अशी मागणी केली आहे. “आज ठोस निर्णय घेतला नाही, तर भविष्यातील अनेक राष्ट्रीय खेळाडू घडण्याआधीच थांबतील. खेळाडू घडले तरच शहराचे नाव देश-विदेशात उज्ज्वल होईल,” असे भावनिक मत त्यांनी व्यक्त केले.



> क्रीडा शिक्षक हे केवळ शिक्षक नसून ते भविष्यातील राष्ट्रीय खेळाडू घडवणारे शिल्पकार आहेत. त्यांना निवडणूक आणि इतर प्रशासकीय कामांमध्ये अडकवणे म्हणजे खेळाडूंच्या स्वप्नांवर अन्याय करण्यासारखे आहे. जर आपल्याला पिंपरी चिंचवडला खऱ्या अर्थाने ‘क्रीडा नगरी’ बनवायचे असेल, तर क्रीडा शिक्षकांना तात्काळ गैर-क्रीडा कामकाजातून मुक्त करून त्यांना मैदानावर परत आणणे अत्यावश्यक आहे.
>
> – **अरुण पाडुळे**, अध्यक्ष, क्रीडा प्रकोष्ट, भाजपा.

## जीपॅट परीक्षेत राजमाता महाविद्यालयातील दहा विद्यार्थ्यांचे यश



**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

जीपॅट (GPAT) पदव्युत्तर फार्मसी अभिक्षमता परीक्षा २०२६ या राष्ट्रीय स्तरावरील परीक्षेत राजमाता जिजाऊ शिक्षण प्रसारक मंडळाच्या डुडुळगाव शैक्षणिक संकुलातील कॉलेज ऑफ फार्मसीच्या दहा विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन करून महाविद्यालयाचा नावलौकिक वाढविला आहे. कठोर परिश्रम, सातत्यपूर्ण अभ्यास आणि शिक्षकांचे मार्गदर्शन यामुळे विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट गुण मिळवत देशपातळीवर मानाचे स्थान प्राप्त केले आहे.

जीपॅट (GPAT) ही एम.फार्मसी प्रवेश, शिष्यवृत्ती आणि संशोधन क्षेत्रातील करिअरसाठी महत्त्वाची राष्ट्रीय स्तरावरील परीक्षा आहे. ओमकार थोरात (GPAT गुण: 224, अखिल भारतीय क्रमांक: 1444), चिन्मयी शिंदे (200, 2692), जानवी उमाप (197, 3219), धीरज जानकर (191, 3796), पार्थ जाधव (188, 4103), श्रुती भुजबळ (179, 5063), तनुजा सोनवणे (178, 5267), श्रिधन रंधवे (168, 6712), अक्षदा शिंदे (161, 7500), आकाश टिळे (144, 12299) यांनी हे यश संपादन केले.

विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल कॉलेज ऑफ फार्मसीचे प्राचार्य डॉ. अमोल कुंभार, संस्थेचे अध्यक्ष व भोसरी विधानसभेचे प्रथम आमदार मा. श्री. विलासराव लांडे, सचिव मा. श्री. सुधीर मुंगसे, विश्वस्त श्री. विक्रांतजी लांडे, खजिनदार श्री. अजित दा. गव्हाणे, व्यवस्थापन प्रतिनिधी प्रा. किरण चौधरी तसेच रजिस्ट्रार सौ. अश्विनी भोसले यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे कौतुक केले आहे. या यशामध्ये जीपॅट (GPAT) परीक्षेच्या इनचार्ज प्रा. शकीला शेख तसेच इतर प्राध्यापकांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले आहे.या यशामुळे महाविद्यालयाची शैक्षणिक गुणवत्ता अधोरेखित झाली असून, येणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी हे प्रेरणादायी ठरणार आहे.

## सोसायटीधारकांच्या पाण्याचा खर्च बिल्डरांकडून वसूल करा!

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**शहरातील सोसायटीधारकांवर गेल्या अनेक वर्षांपासून पडत असलेल्या पाणीखर्चाच्या अन्यायकारक बोजाबाबत पिंपरी चिंचवड हाऊसिंग सोसायटी फेडरेशनने आक्रमक भूमिका घेतली आहे. 2019 पासून सोसायट्यांनी विकत घेतलेल्या पाण्याचा संपूर्ण खर्च संबंधित बांधकाम व्यवसायिकांकडून वसूल करण्याचे आदेश तातडीने द्यावेत, अशी ठोस मागणी फेडरेशनने केली आहे.**



फेडरेशनच्या मते, अनेक बांधकाम व्यवसायिकांनी प्रकल्प सुरू करताना सोसायट्यांना स्वखर्चाने पाणीपुरवठा करण्याची लेखी हमी दिली होती. मात्र प्रत्यक्षात या हमीपत्राचे सर्रास उल्लंघन करण्यात आले असून, त्याचा आर्थिक फटका थेट नागरिकांना बसला आहे. त्यामुळे हा केवळ प्रशासकीय प्रश्न नसून नागरिकांवरील आर्थिक अन्यायाचा गंभीर प्रकार असल्याचे फेडरेशनने स्पष्ट केले.

या पार्श्वभूमीवर, हमीपत्राचे उल्लंघन करणाऱ्या बांधकाम व्यवसायिकांविरोधात गुन्हे दाखल करावेत, तसेच भविष्यात अशा व्यावसायिकांना कोणतीही नवीन बांधकाम परवानगी किंवा पूर्णत्व प्रमाणपत्र (COMPLETION CERTIFICATE) देऊ नये, अशी कडक भूमिका फेडरेशनने मांडली आहे.

> सोसायटीधारकांनी 2019 पासून पाण्यासाठी भरलेला प्रत्येक रुपया हा त्यांच्या हक्काचा आहे. बांधकाम व्यवसायिकांनी दिलेल्या हमीपत्राचे उल्लंघन करून नागरिकांवर अन्याय केला आहे. त्यामुळे हा संपूर्ण खर्च संबंधित बिल्डरांकडून वसूल करून त्यांच्यावर कठोर कारवाई झालीच पाहिजे. अन्यथा, नागरिकांच्या हक्कांसाठी आम्हाला रस्त्यावर उतरून तीव्र आंदोलन करावे लागेल.
>
> – **संजीवन सांगळे**, अध्यक्ष, पिंपरी चिंचवड हाऊसिंग सोसायटी फेडरेशन.

फेडरेशनच्या पदाधिकाऱ्यांनी स्पष्ट केले की, “हमीपत्र देऊनही जबाबदारी न पाळणाऱ्या बिल्डरांना संरक्षण देणे म्हणजे नागरिकांच्या हक्कांवर गदा आणणे होय. प्रशासनाने आता कठोर निर्णय घेतला नाही, तर ही प्रवृत्ती आणखी वाढेल.” या मागण्यांमुळे प्रशासनासमोर मोठे आव्हान उभे राहिले असून, आता महानगरपालिका यावर कोणती ठोस कारवाई करते, याकडे संपूर्ण शहराचे लक्ष लागले आहे.